सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

संदर्भ क्र.-वि.वि.मं. २०१८-१९/२६२

दिनांक : 31 Jul 2018

प्रति ,
मा.प्राचार्य,
जयहिंद कॉम्प्रेहेन्सिव्ह एज्युकेशनल इन्स्टिट्युट
नारायणगांव जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग
कुरण पत्ता: कुरण ता.: जुन्नर जि: पुणे पिनकोड:
410511

**विषय : कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना मान्यता.**

महोदय/महोदया,

आपल्या प्रस्तावास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबवण्याबाबत विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणास आपण पाठविलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. या योजनेबाबतच्या सर्व सुधारित नियम व अटींचे पालन करून वरील योजना आपल्या महाविद्यालात माहे जुलै-२०१८ ते माहे फेब्रुवारी-२०१९ ह्या दरम्यानच्या कालावधीत राबविणे अपरिहार्य आहे.

सदर योजनेसंबंधीची संपूर्ण माहिती विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना व उपक्रम मार्गदर्शिका पुस्तिकेत दिलेली आहे. सदर मार्गदर्शिकेतील किंवा आपणास वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे व नियमांमधील सुधारित बदलानुसार सर्व नियम व अटींचे पालन करून वरील योजना आपल्या महाविद्यालयात राबवणे.

या योजनेच्या नियमावलीनुसार प्रत्येक महाविद्यालय व संस्थेमध्ये विद्यार्थी विकास मंडळाचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मा.प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. या संयुक्त खात्यावर विद्यार्थी विकास मंडळाकडून मंजूर झालेल्या अन्य योजनाच्या अनुदानाचे वितरण व खर्च करणेही नियमाला धरून होईल.विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेख परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही असे विद्यार्थी मंडळ प्राधिकरणाने निर्धारित केले आहे.कळावे,ही विनंती.

आपला,

संचालक ,
विद्यार्थी विकास मंडळ

**टिप: १).योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही बदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.**

**२).मागील शैक्षणिक वर्षात या योजनेअंतर्गत आपणास विद्यापीठाकडून अनुदान प्राप्त झाले असल्यास आणि आपल्या महाविद्यालयाने या प्राधिकरणास आपल्या महाविद्यालयाच्या बँक खात्याबाबत माहिती पाठविलेली असेल तर 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेसाठीची प्रथम हफ्त्याची रक्कम रु. १२०००/- 'RTGS' द्वारे आपल्या महाविद्यालयाच्या बँक खात्यात जमा केली जाईल.**